MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

# Vidyawarta®

International Multilingual Research Journal

Issue-22, Vol-04 April to June 2018



Editor
Dr.Bapu G.Gholap

LIQUISOFT.COM

28

# भारतीय आदिवासींचे कामजीवन

**प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के**
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर
ता. भोकर जि. नांदेड

**********

**प्रस्तावना :**

भारतातील आदिवासी, सर्वांत प्राचीन, असा समुदाय जो इतिहासाच्या प्रदिर्घ शृंखलांनी जोडलेला असून वेगवेगळ्या नावाने ओळखले जातात. यांना आदिवासी या नावाप्रमाणे वनवासी, गिरिजन या नावांनेही ओळखले जाते. संस्कृतीक सभ्यतेच्या क्रमविकासात यांना जंगलाकडे लोटण्यात आले, उपजीविकेची मर्यादीत साधने असल्याने यांची अर्थव्यवस्था मर्यादीत राहिली. शेती व जंगली फळे, फुले, मुळे हे यांचे अन्न बनले. आदिवासी जनसमूदायाची अनेक उल्लेख वेदकालीन वाङ्मयात येतात. रामायणात किरात, निषाद, शबर इ. आदिवासींचा उल्लेख आहे. महाभारतात पुलिंद व किरात हे हिमालयात राहणारे आदिवासी असा उल्लेख येतो. या संदर्भात एकलव्याची कथा सर्वश्रूत आहे.

भारत हा आदिवासींच्या लोकसंख्येबाबत जगात आफ्रिका खंडाखालील दुसऱ्या क्रमांकाचा देश म्हणून आजही प्रसिध्द आहे. २००१ च्या जनगणने नुसार आदिवासींची लोकसंख्या सुमारे दहा कोटी होती. अशा या संख्येने मोठ्या विस्तृत असणाऱ्या आदिम समाजाचा भारतीय संस्कृतीवर प्राचीन काळापासून काही प्रमाणात प्रभाव असणे स्वाभाविक आहे. त्यांच्या चालीरिती, धार्मिक कल्पना, राहणीमान आणि सामाजिक परिस्थिती यांचा सुक्ष्म अभ्यास केला असता असे आढळते, की नागरी संस्कृतीशी त्यांचा संपर्क येऊनही यातील बहुतेक जमातींनी स्वत:ची समाजरचना आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये अद्याप टिकविली आहेत. या बाबत त्यांची युवागश्हे किंवा शयनगृहे बोलकी असून त्यातून त्यांचे लैंगिक संबंध आणि तत्संबंधीच्या प्रजोत्पादनाच्या कल्पना स्पष्ट होतात.[१] आदिवासींच्या कामजीवनाची माहिती प्रस्तुत शोध निबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे. वेदकालीन समाज जसा 'योनी शुचिता' सारख्या कल्पना मान्य करीत नव्हता त्याच प्रमाणे आजही काही आदिवासी जमाती मुक्त लैंगिक जीवन उपभोगतात. परंतु हे मुक्त लैंगिक जीवनालाही एक बांध आहे. जो गोटुलच्या रुपाने पहावयास मिळतो.

गोटुल म्हणजे आदिवासी तरुण तरुणीच्या झोपण्याचे स्थान, शयनगृह यांना युवागृहे म्हणतात. जमातपरत्वे त्यांची भिन्न भिन्न नावे पहावयास मिळतात, या सामुदायिक शयनगृहांना गिटिओर, धुमाकुरिया, जोंकरपा, बासा, मोरुंग, रंगबंग अशी नावे आहेत. मुंडाच्या खेड्यातील सर्व अविवाहित तरुण रात्रीच्या वेळी एका स्वतंत्र झोपडीत झोपतात. तर अविवाहित तरुण मली एखाद्या अपत्यहिन दांपत्याच्या किंवा विधवा स्त्रीच्या घरात झोपतात.[२] 'बैगा' जमातीत मुलं मुली विशिष्ट वयाचे झाल्यानंतर ते युवागृहात येतात. त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था लोकांतर्फे केली जाते. त्यांनी खावे, प्यावे, नृत्य करावे, मौज करावी आणि प्रेम ही करावे अशी व्यवस्था या जमातीत केली जाते. युवक युवतींना लैंगिक स्वातंत्र्य असते. समजा युवती गर्भवती झाली असेल तर अशा वेळी त्या युवतीला आपल्या प्रियकरासोबत पळून जाऊन विवाह करावा लागतो. 'अबोर' जमातीत 'रसेंग' मध्ये युवक दुसऱ्या. युवकगृहातील युवती सोबत रात्र घालवितात. मुलाची निवड करण्याचे स्वातंत्र्य मुलीस असते. पण आपल्याच कुळातील मुलाची निवड करणे निषिध्द असते. युवकांना जेष्ठ युवतीकडून लैंगिक शिक्षण दिले जाते. माडिया गोंडातील युवकास 'चेलिक' आणि युवतीस 'मोटियारी' म्हणतात. कोणत्याही 'मोटियारी' चे नाव एखाद्या 'चेलिक' सोबत जोडले जाते. पूढे त्यांच्यात आकर्षण निर्माण होऊन ते आपसात लैंगिक संबंध प्रस्तापित करतात. गोटुलमध्ये लैंगिक संबंध ठेवणे अनैतिक मानले जात नाही. रात्रीच्या वेळी चेलिक आणि मोटियारी दोघेही गुपचूप बाहेर जातात.

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No.62759 Vidyawarta® April To June 2018 Issue-22, Vol-04 0121

जर मोटियारी गर्भवती राहिली तर ती चेलिकचे नाव सांगते आणि त्यांना विवाह करणे अनिवार्य असते. युवागृहातील गोटुलमध्ये युवक युवतीचे लैंगिक संबंध असतात. कारण या लोकांचा असा विश्वास असतो की, गोटुलाचे रक्षण 'लिंगो' (Lingo) नावाची देवता करीत असते. त्यामुळे गोटुलमध्ये युवक युवतीनी लैंगिक संबंध ठेवले तरी त्या मुलीला गर्भ रहात नाही. गोटुलमध्ये ठेवल्या जाणाऱ्या लैंगिक संबंधामुळे मुल होणे ही गोष्ट स्वत: लिंगो देवतेला आपमान वाटतो. म्हणून लिंगो देवता आपला सन्मान ठेवण्यासाठी मुलीला गर्भ राहू देत नाही.[०३] बस्तरच्या आदिवासी गोटुल संदर्भात ओशो म्हणतात,[०४] "या आदिवासींचे लग्न वैज्ञानिक वाटतात, गावातील मुले मुली एकमेकांना ओळखल्या नंतर, सर्व अनुभवानंतर लग्नाचा निर्णय घेतात. हा निर्णय जन्मपत्रिका, पंडित पुरोहित, आई बाप घेत नसून हे तरुण तरुणी स्वत: निर्णय घेतात. स्वत:च्या अनुभवावरुन कोणत्या मुलीने कोणत्या मुलाला सर्वाधिक तृप्ती दिली आणि कोणत्या मुलाने कोणत्या मुलीला सर्वाधिक आनंद दिला, कोण दोघे एकमेकात मिसळले, कोणात ताळमेळ निर्माण झाला. हे पाहिले जाते."

आदिवासींची श्रध्दा 'लिंगो' देवतेवर असली तरी गोटुल मधील काही युवतींना गर्भ रहातो. डॉ. एल्विन व्हेरियर यांना असे आढळून आले की, हजार मुली (मोटियारी) पैकी फक्त ऐंशी मुली गर्भवती राहिल्या होत्या.[०५] या युवागृहामुळे सामाजिक सुरक्षितता मिळते. समाजातील सामाजिक वारसांचे संक्रमण आणि संवर्धन युवागृहामार्फत होत असते. इतकेच नव्हे तर वर वधूची निवड करण्याची संधी त्यांना युवागृहात प्राप्त होते. एकदा विवाह झाला की मग मात्र त्यांना युवागृहात सदस्यत्व दिले जात नाही. जगातील सर्वच आदिवासी समाजात युवागृहाचे अस्तित्व दिसून येते.[०६] काही जमातीत वयाच्या ४ ते ५ वर्षाच्या बालकांना युवागृहात प्रवेश देतात. जर विवाहानंतर युवती ही विधवा झाली तर पुन्हा युवागृहाची सभासद होऊ शकते. विधवा युवतींप्रमाणे विधूर युवकांनाही त्याचा पुन्हा विवाह होईपर्यंत युवागृहाचे सभासद होता येते.[०७] आदिवासी समाजात सामान्यत: विधवा नसते. पतीच्या मश्त्यू नंतर जशीही शोकाकूलता कमी होते. ती दुसरा विवाह करते. बरेचदा हा विवाह दिरा सोबत केला जातो ज्यास 'देवर बट्टा' विवाह म्हणतात,[०८] ऋग्वेदातही (१०/१८/०८) पतिच्या मश्त्यूने शोकाकूल स्त्रीस प्रेताजवळून उठण्यासंबंधी बोलतांना म्हणतात की, 'तुझा दिर तुझ्याशी विवाह करण्यास तयार आहे.' भिल्ल समाजातील त्याच स्त्रिया विधवा राहतात ज्यांचे वय जास्त असेल किंवा दुसरेंदा विवाहाला कोणी तयार नसेल.[०९] आदिवासी महिलांची स्थिती व प्रतिष्ठा इतर महिलांपेक्षा वेगळी असते. याच कारणामुळे लैंगिक अपराध समाजात लाजिरवाणी घटना मानली जात नाही.[१०] आसाम मधील 'कुकी' आणि 'दार्लूंग' समाजातील मुलगा कोणत्याही मुलीसोबत काही आठवडे, महिने आणि कधी कधी कित्येक वर्ष पती प्रमाणे रहातो, शेवटी जर एकमेकांची मने जुळल्यास लग्न करतात अन्यथा काही भुर्दंड देवून तो निघून जाते.[११] हिमाचल प्रदेशातील जौनसार आदिवासीमध्ये 'पुलालुअन' प्रथा लागू असून त्यानुसार केवळ एक भाऊ (मोठा) लग्न करतो आणि सर्व भाऊ त्याचे भागिदार बनतात. हे आवश्यक नाही की मोठ्या भावाने एकच लग्न करावे. तो अनेक विवाह करु शकतो. या बहुपत्नी प्रमाणे बहुपति प्रथाही पहावयास मिळते.[१२] मध्यप्रदेशातील देवास किल्याच्या नन्दापाई कबाडी गावातील गोंड लोकांचा सहवास जंगलात व झाडींमध्ये करतात. कारण त्यांचा असा समज आहे की, मृत पूर्वजांचा आत्मा घरात निवास करतो. त्यामुळे त्यांच्यासमोर सहवास म्हणजे एखाद्या दुर्घटनेला आमंत्रण होय. मध्यप्रदेशातीलच रतलाम आणि मन्दसौर जिल्ह्यातील बॉछंडा समाज आहे. या समाजातील सर्वात मोठी मुलगी 'खिलवाडी' (समाजमान्य एक प्रकारची वेश्या) बनते. जी ग्रहस्थी सोबत आर्थिक उत्पन्न मिळविल्याने सन्मानित जीवन व्यतीत करते.[१३] थारु या जमातीतील (नैनिताल ते नेपाळ या प्रदेशातील) स्त्रियांचे पुरुषांवर स्वामित्व दिसून येते. या स्त्रियांच्या मते, मुघलांच्या अत्याचारापासून आपल्या स्त्रियांना वाचवण्यासाठी राजपूतांनी या प्रदेशात त्यांना लपविले. अत: त्या

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 | UGC Approved Sr.No.62759 | Vidyawarta® | April To June 2018 Issue-22, Vol-04 | 0122

स्वत:ला राणी किंवा राजकुमारी मानतात आणि पुरुषांना नौकर. या स्त्रियांना पर्याप्त स्वातंत्र्य असून त्यांच्यात व्याभिचार मोठ्या प्रमाणात दिसतो. तर पुरुष पीडित असून स्त्रियांकडून रक्षणाची परमेश्वराला प्रार्थना करतात. या स्त्रिया अत्याधिक रुपवतीही आहेत.[१४] हिमाचल मधील चम्बा जिल्ह्यातील चुरा तहसील मधील जमातीत विवाह पूर्व संभोग वर्जित नसून विवाह पुर्व संतान होणेही वाईट माणले जात नाही.[१५] खासी, तोडा, खस अशा काही जमाती बहुपतीत्ववादी आहेत. यामुळे सर्वभाऊ एका स्त्रीचे पती असतात. क्वचित चुलत व अन्य भाऊ देखील पती म्हणून सामील होतात.[१६] आदिवासींच्या नागा जमातीत पुत्र आपल्या सख्या आईस सोडून वडिलांच्या इतर विधवा स्त्रियांशी विवाह करतो. याचे कारण यौन संतुष्टी नसून स्त्रियांना मिळणाऱ्या संपत्तीचा उत्तराधिकार प्राप्त करणे आणि कुटुंबातील संपत्ती कुटुंबातच राहावी ही भावनाही आहे.[१७] अशा पध्दतीने भारतातील आदिवासींच्या कामजीवनाचे काही उदाहरणे पहाता येतील. प्रत्यक्षात आदिवासींच्या कामजीवनावर अजून पुष्कळ अभ्यास व्हायचा आहे; परंतु ही उदाहरणे आम्हास यांची लैंगिक वर्तने समजण्यास पुरेशी आहेत.

## निष्कर्ष

सारांश रुपाने असे म्हणता येईल की, भारतात वेद व महाकाव्यकालीन भारतीय स्त्रियांना ज्याप्रमाणे लैंगिक स्वातंत्र्य होते; त्याच प्रमाणे आजही भारतातील आदिवासी समाजात काहीं जमातीत स्त्रियांना लैंगिक स्वातंत्र्य व जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य असल्याचे दिसून येते. आदिवासी जमातीतील 'गोटूल' किंवा 'युवागृहे' त्याचीच साक्ष देतात. तसेच आधुनिक समाजातील 'योनी शुचिता' या संकल्पना आदिवासीच्या कांही जमातीत गौणरुप असल्याचे दिसून येते. तसेच आधुनिक स्त्रियांपेक्षा आदिवासी स्त्रियांना पर्याप्त स्वातंत्र्य असल्याचे आढळून आले.

## संदर्भ ग्रंथ सूची


(१) देशपांडे, सु. र., भारतीय कामशिल्पे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८६, पृ.७७

(२) पं. जोशी महादेव शास्त्री, संपा; भारतीय संस्कृती कोष, भा.स.को.म. पुणे, खंड तिसरा १८८७, पृ.१२६

(३) डॉ. आगलावे प्रदीप, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००४, पृ.११९

(४) मा. अमृत साधना, संपा; ओशो टाईम्स (मासिक) उडियो पंख पसारसे, ताओ पब्लिशिंग, पुणे, जुन २००५, पृ.३९,४०

(५) डॉ. आगलावे प्रदीप, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००४, पृ.११९

(६) लोटे, रा.ज., आदिवासी समाजोच समाजशास्त्र, पिंपळापूरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, २००४, पृ.६५

(७) कित्ता पृ.६५

(८) डॉ. मेहता प्रकाश चंद्र, आदिवासी विकास एवं प्रथाएँ, डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २००६, पृ.४७

(९) कित्ता पृ.५१

(१०) कित्ता पृ.६५

(११) डॉ. त्रिपाठी रामसागर, अनु. अनंगरंग (परिशिष्टावरुन) चौ.स. प्रतिष्ठान, दिल्ली, २००४, पृ.३४७

(१२) कित्ता पृ.३५१

(१३) कित्ता पृ.३५७

(१४) कित्ता पृ.३५०

(१५) कित्ता पृ.३५२

(१६) देशपांडे, सु. र., भारतीय कामशिल्पे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८६, पृ.७८

(१७) गुप्ता, एस.एस.; शर्मा डी.डी., समाजशास्त्र, साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा, २००४, पृ. ४७९; डॉ. भोईटे उत्तम; डॉ. बोबडे प्रकाश, सामाजिक संस्था, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपुर, १९९०, पृ.३९


९९९.